सायं. दैनिक

संस्थापक -कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

मंगळवार १६-११-२००४

## बालकामगार शाळेत 'रोजा इफ्तार पार्टी'चे आयोजन



आझाद अली शाह शिक्षण संस्थेद्वारे संचलित बालकामगार शाळेत रोजा ईफ्तार सोडताना प्राचार्य साजिद पाशा, संजय कदम, पॅट्रीक मार्टीन, जयश्री सोनकांबळे, रझिया शेख व आनंद खोब्रागडे आदि मान्यवर दिसत आहे. ( छाया - सिद्धार्थ कांबळे )

औरंगाबाद (प्रतिनिधी) - आझाद अली शाह शिक्षण संस्थेद्वारे संचलित आरेफ कॉलनी येथील इंडस बालकामगार शाळेत रोजा इफ्तार पार्टी मोठ्या उत्साहात, आनंदमय वातावरणात व सर्व धर्मीय बालकामगार व त्यांचे पालकांसोबत यशस्वीरीतीने पार पडले.

या रोजा इफ्तार कार्यक्रमात इंडस बालकामगार शाळेचे महाराष्ट्र प्रकल्प संचालक पॅट्रीक मार्टीन व इंडस कार्यालयातील कर्मचारी व पदाधिकारी

कल्पना भगत, आव्हाड यांच्यासोबत आझाद अली शाह शिक्षण संस्थेची संचालिका शाह सुरैय्या खान, उपाध्यक्षा सौ. रझिया शेख व प्राचार्य साजिद पाशा उपस्थित होते.

या कार्यक्रमात सर्व बालकामगारांसोबत त्यांचे पालक वर्ग, भाऊ, बहीण आवर्जुन व मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष म्हणजे सदरील रोजा इफ्तार कार्यक्रमात सर्व धर्मीय समभाव व जिव्हाळ्याचे दर्शन घडले कारण पालकवर्ग,

एका ताटात रोजा सोडला. सदरील रोजा इफ्तार सोडण्याकरीता दुवा (प्रार्थना) साजीद पाशा यांनी केली व त्यांच्या पाठीमागे सर्वांनी प्रार्थना म्हटली. कार्यक्रम यशस्वीरीतीने संपन्न झाला व या कार्यक्रमाचे प्रमुख संयोजन आझाद अली शाह शिक्षण संस्थेच्या वतीने शाह माजीद खान व साजीद पाशा यांनी केले होते. कु. झीनत कौसर, सौ. संगिता म्हस्के, कु. हेमा भाले, सौ. फिलोमिना पारखे व सौ. छाया देहरे या सर्व बालकामगार शाळेतील